# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## राष्ट्रीय सेवा योजना

गणेशखिंड, पुणे – ४११ ००७

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

डॉ. प्रभाकर देसाई
एम्.ए., पीएच् डी.
संचालक

कार्यालय क्र. : ०२०–२५६२२६८८/८९
: ०२०–२५६२२६९०/९१
: ०२०–२५६२२६९२
: ०२०–२५६९७३४१


संदर्भ : रासेयो/२०२२–२३/८२८ दि. ०२/११/२०२२

प्रति,
मा.प्राचार्य/संचालक,
रासेयो संलग्नित सर्व महाविद्यालये परिसंस्था,
फक्त पुणे शहर,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ.

**विषय : स्वच्छ सर्वेक्षण २०२३ अंतर्गत नागरिकांचा सहभाग वाढविण्यासाठी शहर पातळीवर आयोजित विविध स्पर्धांबाबत**

महोदय,

मा. उप आयुक्त, घनकचरा व्यवस्थापन, पुणे महानगरपालिका, पुणे यांच्या पत्रानुसार महाराष्ट्र शासनाकडून स्वच्छ सर्वेक्षण २०२३ ची सुरूवात झाली आहे. या सर्वेक्षण २०२३ ची थीम वेस्ट टू वेल्थ अशी आहे. पुणे शहरातील नागरीकांचा सहभाग वाढविण्यासाठी शहर पातळीवर दि. ०१ ते २० नोव्हेंबर २०२२ दरम्यान विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये जिंगल स्पर्धा, शॉर्ट मुव्हीस स्पर्धा, पोस्टर्स ड्रॉइंग स्पर्धा व स्ट्रीट प्ले स्पर्धा अशा विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे.

तरी आपल्या महाविद्यालयातील जास्तीत जास्त रासेयो स्वंयसेवकांना या उपक्रमात सहभागी होण्याकरिता प्रोत्साहीत करावे व स्वच्छ सर्वेक्षण २०२३ स्पर्धांमध्ये सहभागी स्वयंसेवकांची ऑन लाईन नावनोंदणी https://docs.google.com/forms/d/1yHTzrTXQLthXyRjxm7jd5WUTN6KTDocPomuGG_vmqWo/viewform?edit या लिंकवरती करण्यात यावी. या स्पर्धांमध्ये सहभागी होण्याकरिता महानगरपालिकेचा गुगल फॉर्म भरणे आवश्यक आहे. या उपक्रमामध्ये महाविद्यालयामार्फत पुणे महानगरपालिकेला योग्य ते सहकार्य करण्यात यावे. अधिक माहितीकरिता व नियमावलीकरिता पुणे महानगरपालिकेच्या सोबत जोडलेल्या पत्राचे अवलोकन करावे. कळावे, ही विनंती.

संचालक
राष्ट्रीय सेवा योजना

सोबत : मा. उप आयुक्त, घनकचरा व्यवस्थापन, पुणे महानगरपालिका, पुणे यांचे पत्र

उप आयुक्त कार्यालय
घनकचरा व्यवस्थापन
पुणे महानगरपालिका
जावक क्र.:- घकव्यका/3८९२
दिनांक :- ०१/११/२०२२

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे-७.
आवक/जावक क्र.: 568
दिनांक 02 NOV 2022
राष्ट्रीय सेवा योजना
शाखा-

मा. संचालक
राष्ट्रीय सेवा योजना
पुणे विभाग

यांजकडेस सविनय सादर...

विषय :- स्वच्छ सर्वेक्षण २०२३ अंतर्गत नागरिकांचा सहभाग वाढविण्यासाठी शहर पातळीवर आयोजित विविध स्पर्धांबाबत.

संदर्भ :- महाराष्ट्र नागरी विकास अभियान संचालनालय पत्रक्र.राअस/स्वमअ/४३६/२२-२३, दिनांक ०१/०६/२०२२.

महोदय,

वरील संदर्भांकित पत्रान्वये महाराष्ट्र शासनाकडून स्वच्छ सर्वेक्षण २०२३ (SS2023) ची सुरवात झाली असल्याचे कळविण्यात आले आहे. या सर्वेक्षण २०२३ ची थीम 'वेस्ट टू वेल्थ' अशी असून त्याचे सविस्तर टूलकीट जाहीर करण्यात आलेले आहे.

नागरिकांचा सहभाग वाढविण्यासाठी शहर पातळीवर विविध स्पर्धांचे आयोजन करण्याचे स्वच्छ सर्वेक्षण २०२३ साठीच्या कार्यपुस्तिकेतील 'नागरिकांचा सहभाग,निकष क्र.४' मध्ये नमूद केले आहे. त्या अनुषंगाने शहर पातळीवर जिंगल स्पर्धा, शॉर्ट मुव्हीस स्पर्धा, पोस्टर्स ड्रॉइंग स्पर्धा, म्युरल्स स्पर्धा व स्ट्रीट प्ले स्पर्धा या प्रकारांत स्पर्धा घेण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

| क्र. | स्पर्धेचे नाव | गट | नियम | क्रमांक |
|---|---|---|---|---|
| १. | जिंगल स्पर्धा | खुला गट | १. जिंगल जास्तीत जास्त २ मिनिट व कमीत कमी १ मिनिट वेळेची असावी.<br>२. जिंगल बनविताना मोबाईल ॲपचा वापर करण्यात यावा.<br>३. जिंगलमध्ये संगीत व शब्दांकन असणे आवश्यक आहे. | प्रथम - ७,०००/-<br>द्वितीय - ५०००/-<br>तृतीय- ३०००/- |
| २. | शॉर्ट मुव्हीज स्पर्धा | खुला गट | १. शॉर्ट मुव्हीस जास्तीत जास्त ५ मिनिट व कमीत कमी २ मिनिट वेळेची असावी.<br>२. शॉर्ट मुव्ही बनविताना मोबाईलद्वारे शुट करण्यात यावे.<br>३. शॉर्ट मुव्हीमध्ये शहराचे नाव, स्वत:चे नाव, महानगरपालिका कोड ८०२८१४ दर्शविण्यात यावे. | प्रथम - १०,०००/-<br>द्वितीय - ७०००/-<br>तृतीय- ५०००/- |
| ३. | पोस्टर्स ड्रॉइंग स्पर्धा | खुला गट | १. पोस्टर्स करीता फुल ॲम्पीयर कागद/ कार्डबोर्ड वापरावे.<br>२. चित्र रंगविण्यासाठी माध्यम (वॉटर/पोस्टर, ऑईल पेस्टल/ब्लॅकपेन इत्यादी साहित्य) वापरावे.<br>३. पोस्टर्सचे पाठीमागील बाजूस शहराचे नाव, स्वत:चे नाव, मोबाईल क्र. पत्ता व महानगरपालिका कोड ८०२८१४ नमूद करावे. | प्रथम - ७,०००/-<br>द्वितीय - ५०००/-<br>तृतीय- ३०००/- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ४. | म्युरल्स स्पर्धा | खुला गट | १. म्युरल्स हे इको फ्रेंडली असावे यासाठी माध्यम (कागद,माती, लाकूड, साबण, कार्डबोर्ड इ.साहित्य ) वापरावे<br>२. म्युरल्सची साईज कमीत कमी २ * २ फुट असावी व जास्तीत जास्त ६ * ६ फुट असावी. | प्रथम - १०,०००/-<br>द्वितीय - ७०००/-<br>तृतीय- ५०००/- |
| ५. | स्ट्रीट प्ले स्पर्धा | खुला गट | १. स्ट्रीट प्लेमध्ये कमीत कमी ५ सदस्य असावे.<br>२. स्ट्रीट प्लेद्वारे स्वच्छतेबाबतची जनजागृती शहरातील ज्या भागात केली जाईल तेथील व्हिडिओ चित्रीकरण मोबाईलद्वारे करणेत यावे. जास्तीत जास्त ५ मि. व कमीत कमी ३ मि. पथनाट्य असावे.<br>3. व्हिडिओ मध्ये शहराचे नाव, पथनाट्य ग्रुपचे नाव, महानगरपालिका कोड ८०२८१४ दर्शविण्यात यावे. | प्रथम - १०,०००/-<br>द्वितीय - ७०००/-<br>तृतीय- ५०००/- |

सर्व स्पर्धांकरीता सर्वसाधारण नियम व सूचना -

1. सदर स्पर्धांकरीता प्रवेश विनामुल्य राहील. सर्व स्पर्धेचे विषय हे स्वच्छ सर्वेक्षण, आझादी का अमृत महोत्सव, वेस्ट टू वेल्थ, SBM-II अंतर्गत विविध उपक्रम, माझी वसुंधरा अभियान, सफाई मित्र सुरक्षा चॅलेंज, स्वच्छता विषयक जनजागृती, कचरा वर्गीकरण, प्लास्टिक बंदी, Air quality improvement (हवेतील गुणवत्ता सुधार), हागणदारीमुक्त शहर व पर्यावरण जनजागृती इ.राहतील.
2. सर्व स्पर्धांकरीता आवश्यक असणारे साहित्य स्पर्धकांचे राहील.
3. सर्व स्पर्धेकरीता महानगरपालिका जाहीर करेल तो गुगल फॉर्म भरून स्पर्धेत प्रवेश घेणे अनिवार्य राहील. गुगल फॉर्ममध्ये विचारण्यात आलेली माहिती भरून त्यावर आपले पोस्टर्स व म्युरल्सचे फोटो अपलोड करावयाचे आहेत. तसेच जिंगल्स, शॉर्ट मुव्हीज, व स्ट्रीट प्ले साठीचे गुगल फॉर्म भरून त्याचे ऑडीओ व व्हिडिओ मनपा मुख्य इमारत, दुसरा मजला, स्वच्छ सर्वेक्षण वॉर रूम याठिकाणी पेन ड्राईव्हद्वारे सादर करावयाचे आहे. ही सर्व माहिती पूर्ण असलेले फॉर्म्स म्हणजेच स्पर्धकांची अंतिम प्रवेशिका समजली जाईल. गुगल फॉर्म साठी लिंक (link- https://docs.google.com/forms/d/1yHTzrTXQLthXyRjxm7jd5WUTN6KTDocPomuGG_vmqWo/edit )
4. म्युरल्स स्पर्धेकरीता गुगल फॉर्म भरून त्यावर म्युरल्सचे फोटो अपलोड करावेत. अंतिम परीक्षणाच्या वेळी महानगरपालिका सर्व स्पर्धकांसाठी ठिकाण निश्चित करून देईल व त्याठीकाणी सर्व स्पर्धकांनी म्युरल्स परीक्षणासाठी घेऊन येणे आवश्यक असेल.
5. सर्व स्पर्धांचा कालावधी हा ०१ नोव्हेंबर २०२२ ते २० नोव्हेंबर २०२२ असा असेल.
6. आपल्या जिंगल्स किंवा शॉर्ट मुव्हीज अपलोड करताना काही अडचणी आल्यास सदरचे जिंगल्स किंवा शॉर्ट मुव्हीज पेन ड्राईव्हद्वारे स्वच्छ सर्वेक्षण वॉर रूम, दुसरा मजला, पुणे महानगरपालिका मुख्य इमारत, शिवाजीनगर, पुणे याठिकाणी समक्ष सादर करावयाचे आहेत.
7. स्पर्धेतील प्रत्येक गटातील प्रथम येणा-या तीन क्रमांकास धनादेशाद्वारे बक्षिसे देण्यात येतील.
8. महानगरपालिकेने नेमलेल्या परीक्षकांचा निर्णय अंतिम राहील.

9. स्पर्धेत जमा होणारे सर्व साहित्य जिंगल्स, मुव्ही, पोस्टर्स, पथनाट्य शुटींग यावर महानगरपालिकेचा अधिकार राहील. या साहित्याचा वापर महानगरपालिका शहरात जनजागृती करण्यासाठी करेल.

तरी आपल्या अखत्यारीतील सर्व महाविद्यालयांमधून स्वच्छ सर्वेक्षण २०२३ अंतर्गत घ्यावयाच्या वरील नमूद स्पर्धांमध्ये जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना सहभागी करून घ्यावे ही विनंती.

मा.स.कळावे.

(आशा राऊत)
उप आयुक्त
घनकचरा व्यवस्थापन
पुणे महानगरपालिका